# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/11/2023 (सोमवार) सकाळ

---

## विनयभंग

**१) पोलीस स्टेशन अरोली** :- दि. १८/११/२०२३ रोजी रात्री ०७/३० वा. सुमारास फिर्यादीची अल्पवयीन पीडीत मुलगी वय ०५ वर्ष १० महीने हि खेळत असता यातील **आरोपी नामे- सुनील उर्फ सोन्या शामु ढोरे वय २३ वर्ष, रा. रेवराल टोली ता. मौदा जि. नागपुर** याने फिर्यादीची कोणतीही परवानगी न घेता तुला फटाके घेवुन देतो असे आमीश दाखवुन फिर्यादीचे भासरे यांचे घराकडील रोडवर गावाबाहेर अंधारात घेवुन गेला व तिला तुझा पॅन्ट काढ असे म्हणुन तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरूध्द कलम ३६३, ३५४(अ) भादवी सहकलम १२ बा.लै.स.अधी.प्र.का. स.क. ३(२)(अं), ३(१) (w) (ii) अनुसुचित जाती जमाती कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि निशांत फुलेकर पोस्टे अरोली मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

**२) पोलीस स्टेशन मौदा** :- फिर्यादी व आरोपी नामे- **१) युवराज बाळकृष्ण बचाले, वय ३५ वर्ष रा. चिकना २) ०२ महिला आरोपी** हे एकाच गावात राहत असून फिर्यादी यांचे एकमेकासोबत चांगले पटत होते व बोलणे चालणे होते फिर्यादीचे पतीने आरोपींकडुन १०००००/- रूपये पैसे उसने मागीतले होते व सदर रक्कम परत सुध्दा केले होते. गावामध्ये ग्रामपंचायत निवडणूक पार पडली होती. आरोपी क्र. १ यांची पत्नी सरपंच पदाकरीता उभी होती. तिचा निवडणूकीमध्ये पराभव झाला तो राग मनात ठेवून **दि.** 10/11/2023 चे 09/00 वा. ते 09/15 वा. दरम्यान फिर्यादी ही घरी हजर असतांनी व तिचे पती व मुल घरीच हजर होते. युवराज बाचाले हा घरी आला व पैशाच्या मागणीवरून वादविवाद करू लागला. त्यावर फिर्यादीचे पतीने आरोपी क्र. १ याला तुझे पैसे मी परत केले तु मला पैसे मागू नको असे म्हटले असता फिर्यादीच्या पतीसोबत झगडा भांडण करून शिवीगाळ करू लागला. त्यावेळी फिर्यादीने भांडणाचा आवाज आल्यामुळे हॉलमध्ये मध्यस्थी करण्याकरीता गेली असता ०२ महिला आरोपी या सुदधा फिर्यादीच्या अंगावर धावून आले. व शरीरावर नको त्याठिकाणी स्पर्श करून फिर्यादीला लज्जा वाटेल असे हिला घराच्या बाहेर ओढ असे बोलून ओढताण करून मंगळसुत्र ओढून तोडले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. व फिर्यादीच्या पतीला एकटा रस्त्यात भेटला तर त्याला जिवाने ठार मारू असे बोलले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरूध्द कलम ३५४, ५०४, ५०६, ३४ भादंवि कायदयान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ असलम नवरंगाबादे बनं. 171 मो क्र. 8669816049 हे करीत आहे

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर